मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जी कॉम निर्देशित उद्योगनगरीचा विकास

**महापालिका ग्लोबल कोव्हेनंट ऑफ मेयर्स फॉर क्लायमेट अँड एनर्जी या आंतरराष्ट्रीय करारात सहभागी : 144 देशांतील 13 हजार 700 हून अधिक शहरे सहभागी**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका आता ग्लोबल कोव्हेनंट ऑफ मेयर्स फॉर क्लायमेट अँड एनर्जी या आंतरराष्ट्रीय करारात सहभागी झाली आहे. पर्यावरणाचे रक्षण, ऊर्जा वापरात सुधारणा आणि नागरीकांचे जीवनमान उंचावण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका आता ग्लोबल कोव्हेनंट ऑफ मेयर्स फॉर क्लायमेट अँड एनर्जी या आंतरराष्ट्रीय करारात सहभागी झाली आहे. पर्यावरणाचे रक्षण, ऊर्जा वापरात सुधारणा आणि नागरीकांचे जीवनमान उंचावण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.




हवामान बदलांशी लढण्यासाठी जगभरातील शहरांनी एकत्र येऊन हा करार केला असून त्यामध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेने देखील सहभाग घेतला आहे. यामध्ये १४४ देशांतील १३ हजार ७०० हून अधिक शहरे सहभागी आहेत.

या करारात सहभागी होऊन महापालिकेने शहरातील हरितगृह वायू कमी करणे, स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेचे प्रमाण वाढविणे, हवामान बदलामुळे येणाऱ्या आपत्तींना सामोरे जाण्यासाठी आराखडा तयार करणे आणि याद्वारे पर्यावरण रक्षणासाठी सकारात्मक पाऊले उचलणे ही उद्दिष्ट साध्य करण्याचे ठरविले आहे.

> "पिंपरी-चिंचवडसारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरासाठी पर्यावरण रक्षण ही केवळ गरज नाही, तर आपली जबाबदारी आहे. जीकॉम करारात सहभाग घेतल्यामुळे आपल्याला जागतिक अनुभव, तांत्रिक मदत आणि प्रभावी उपायांचा लाभ होणार आहे, जो शाश्वततेकडे वाटचाल करताना अत्यंत उपयुक्त ठरेल. २०३२ पर्यंत पिंपरी चिंचवडला एक स्वच्छ, हरित शहर बनवण्याच्या ध्येयात हे पाऊल निर्णायक ठरेल.
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका

जीकॉम करारात सहभागी झाल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला देश-विदेशातील इतर शहरांशी अनुभव आणि माहितीची देवाणघेवाण करता येणार आहे. यामुळे शहराला हवामान बदलासंदर्भात तांत्रिक मदत, प्रशिक्षण, उपयुक्त माहिती तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी ठरलेले उपाय वापरण्याची संधी मिळणार आहे. हवामान बदलांशी लढण्यासाठी जगभरातील शहरांनी एकत्र येऊन हा करार केला असून त्यामध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेने देखील सहभाग घेतला आहे. यामध्ये १४४ देशांतील १३ हजार ७०० हून अधिक शहरे सहभागी आहेत.


# अष्टविनायक गणपतींसह पाच मंदिरात ड्रेसकोड लागू, चिंचवड देवस्थान ट्रस्टकडून निर्णय; भाविकांना दर्शनासाठी पोशाख निश्चित

**मंदिराचं पावित्र्य राखण्यासाठी वस्त्रसंहितेचा निर्णय घेण्यात आला असल्याचे चिंचवड देवस्थान ट्रस्टने या पत्रकात म्हटले आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड देवस्थान ट्रस्टकडून अष्टविनायक गणपतींसह पाच मंदिरात ड्रेसकोड लागू करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. चिंचवड देवस्थान ट्रस्टने पत्रक जारी करत माहिती दिली आहे. मंदिराचं पावित्र्य राखण्यासाठी वस्त्रसंहितेचा निर्णय घेण्यात आला असल्याचे चिंचवड देवस्थान ट्रस्टने या पत्रकात म्हटले आहे.

देवस्थान संस्थानकडून मोरगावचा मोरेश्वर, थेऊरचा चिंतामणी, सिद्धटेकचा सिद्धिविनायक, चिंचवडचा मोरया गोसावी संजीवनी मंदिर, खार नारंगी मंदिर या 5 मंदिरांसाठी वस्त्रसंहिता लागू करण्यात आली आहे. हे पाचही देवस्थान चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या अखत्यारित येतात. त्यामुळे चिंचवड देवस्थान ट्रस्टकडून वस्त्रसंहितेचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.




संपूर्ण श्रद्धा आणि भक्तिभावाने महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांच्या संजीवन समाधी मंदिर येथे आणि श्री मंगलमूर्ती वाडा येथे दर्शनाला येणाऱ्या सर्व भाविकांना चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने विनम्र विनंती करण्यात येत आहे. महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांच्या संजीवन समाधी मंदिर येथे व श्री मंगलमूर्ती वाडा या केवळ वास्तू नसून, ते आता, संस्कृती आणि भक्तीचा केंद्रबिंदू आहे.

### ड्रेसकोडबाबत नेमकी नियमावली काय ?

» देवस्थानकडून भाविकांसाठी दर्शनासाठी येताना पोशाख निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये पुरुषांनी पारंपरिक आणि सभ्य पोशाख परिधान करावा. शर्ट, टी-शर्ट आणि पूर्ण पँट किंवा धोतर, कुर्ता पायजमा असा मंदिराच्या पवित्रतेला साजेसा पोशाख परिधान करावा. महिलांनी साडी, सलवार कमीज, पंजाबी ड्रेस किंवा अन्य पारंपरिक पोशाख परिधान करावा. मंदिराच्या पावित्र्यास अनुकूल असलेले आणि आदरयुक्त वस्त्र परिधान करावे. कोणीही अति आधुनिक, अपारंपरिक, पारदर्शक, टोकदार, स्लीव्हलेस, फाटके, शरीरप्रदर्शन करणारे अथवा अनौपचारिक कपडे मंदिर प्रांगणात परिधान करू नयेत, असे चिंचवड देवस्थान ट्रस्टने स्पष्ट केले आहे.

# यंदा नालेसफाईची कामे 7 जूनपूर्वी

## संयुक्त आढावा बैठकीत ठरवण्यात आले उद्दिष्ट; नाल्यांवरील 180 ठिकाणांची अतिक्रमणे हटवणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नाला, ड्रेनेज लाईन सफाईची कामे हाती घेतली जातात. यासाठी घेतल्या जाणाऱ्या आढावा बैठकीला उशीर झाला असल्याचे बोलले जात आहे. तरी मंगळवारी (दि. ८) झालेल्या बैठकीत नाला, ड्रेनेज लाईन सफाईची कामे ७ जूनपूर्वी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून प्रशासनाला कामाला लागण्याचे आदेश दिले आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी ही माहिती दिली. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पृथ्वीराज बी.पी. यांनी मंगळवारी आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक घेतली. या बैठकीला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, सांडपाणी व्यवस्थापन विभागाचे मुख्य अभियंता जगदीश खानोरे, अधीक्षक अभियंता दिनकर गोजारे व संतोष तांदळे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी गणेश सोनुने, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), महामेट्रो, पुणेरी मेट्रो, महावितरण, तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रतिनिधी उपस्थित होते. हद्दीत समाविष्ट २३ गावांतून वाहणाऱ्या नाल्यांवर १८० ठिकाणी अतिक्रमणे आहेत, पावसाळ्यापूर्वी ही अतिक्रमणे काढण्यात येणार आहेत. नाला आणि ड्रेनेज लाईन सफाईची कामे ७ जूनपूर्वी पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभुमीवर शहरातून वाहणारे विविध नाल्यांची आणि ड्रेनेज लाईनची सफाई करण्याच्या कामास प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार ९० किलोमीटर नाले आणि १२५ किलोमीटर लांब ड्रेनेज लाईनची सफाई केली जाणार आहे. महापालिकेच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत निविदा काढण्यात आल्या आहेत. तेवीस गावांत काही नाले वाहत असून या नाल्यांवर १८० ठिकाणी अतिक्रमणे आढळून आली आहे. पाण्याच्या प्रवाहाला अडथळा ठरणारी ही अतिक्रमणे काढण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.

शहरात प्रत्येक पावसाळ्या पाणी साठून राहणाऱ्या ठिकाणांविषयी या बैठकीत चर्चा झाली. ११६ ठिकाणी पावसाळ्यात पाणी साठते, त्यावर आवश्यक ती उपाययोजना करण्याच्या सुचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहे. पाणी साठू नये, पाणी वाहून जाण्याची व्यवस्था करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे. या बैठकीला पीएमआरडीए, पुणे मेट्रो, पुणेरी मेट्रो - हिंजवडी मेट्रो आदी विभागाचे अधिकारीही उपस्थित होते. महापालिका हद्दीलगत आणि पीएमआरडीएच्या क्षेत्रात पावसाळ्यात पाणी साठणाऱ्या ठिकाणी महापालिकेच्या सहकार्याने उपाययोजना केल्या जाणार आहेत.



### समाविष्ट 23 गावांतील कामांसाठी आठ निविदा

» महापालिका हद्दीतील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना नालेसफाई व ड्रेनेज सफाईसाठी प्रत्येकी एक-एक अशा ३० निविदा काढण्यात आल्या आहेत. त्यानुसार ही कामे केली जातील. समाविष्ट २३ गावांमध्ये पावसाळी वाहिन्या नसल्याने या गावांमधील नालेसफाईसाठी आठ निविदा काढण्यात आल्या आहेत. पावसाळ्यातील पूर्वानुभवानुसार ९० किलोमीटर लांबीचे नाले व १२५ पावसाळी वाहिन्या प्राधान्य तत्वावर साफ केल्या जातील. ही कामे सात एप्रिल ते सात जून दरम्यान पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आल्याचे पृथ्वीराज यांनी सांगितले. याशिवाय शहरातील ११६ पाणी साचणाऱ्या ठिकाणांची ( क्रॉनिक स्पॉट्स) स्वच्छताही करण्यात येणार आहे. सर्व क्षेत्रीय अधिकारी व परिमंडळ अधिकाऱ्यांनी या कामांवर नियमित लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समाविष्ट २३ गावांमधील पावसाळी पाण्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सध्या या गावांमधील बांधकाम परवाने पीएमआरडीए देते. त्यामुळे पीएमआरडीएच्या समन्वयाने येथील १२३ पाणी साचणाऱ्या ठिकाणी पावसाळ्यापूर्वी आवश्यक उपाययोजना केल्या जातील. आणि नाल्यांवरील १८९ ठिकाणची अतिक्रमणे पावसाळ्यापूर्वी संयुक्त कारवाई केली जाईल. त्यासाठी तीन चार दिवसांत प्राधान्यक्रमाची यादी पीएमआरडीएला दिली जाईल. पीएमआरडीएकडून आवश्यक पूर्वतयारी झाली व यंत्रसामुग्री उपलब्ध झाल्यावर ही कारवाई केली जाणार आहे.

### मागच्या वर्षी पावसाळी कामे झालीच नाहीत

» गेल्या वर्षी पावसाळ्यात शहरात सर्वत्र पाणी तुंबले होते. त्यामुळे पुणेकरांना चांगलाच त्रास सहन करावा लागला होता. गेल्या वर्षी पावसाळी कामे झालीच नसल्याचा आरोप पुणेकरांनी महापालिका प्रशासनावर केला होता. तसेच पुणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागावर पुणेकरांनी चांगलाच संताप व्यक्त केला होता. त्यानंतर महापालिकेने ऐनवेळी पावसाळी गटारे सफाईची कामे वेगाने केली होती. पावसाळी लाईनच्या चेंबरमधून खासगी कंपन्यांच्या केबल्स टाकण्यात आल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे यंदा अशी परिस्थिती होणार नाही, याची काळजी प्रशासनाकडून घेतली जात आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून जिल्ह्यात सुमारे 3 हजार कोटी रुपयांचा महसूल जमा...

## 621 वाहनासह 25 कोटी 80 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक चरणसिंह राजपूत यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने जिल्ह्यात महसूली उत्पन्न, गुन्हे अन्वेषण तसेच अनुज्ञप्त्यांवर कारवाईच्या बाबतीत गतवर्षीपेक्षा भरीव कामगिरी केली आहे. या माध्यमातून सन २०२४-२५ या वर्षात २ हजार ९९८ कोटी ३३ लाख रुपये इतका महसूल जमा झाला आहे. सन २०२३- २४ च्या २ हजार ७२९ कोटी ४४ लाख रुपयांच्या तुलनेत महसुलात ९.८५ टक्के वाढ झाली आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे अधीक्षक चरणसिंह राजपूत यांनी दिली आहे.

जिल्ह्यात सन २०२४-२५ आर्थिक वर्षात ५ हजार ९९५ गुन्हे नोंदविण्यात आले असून ५ हजार ८९१ जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत ६२१ वाहनासह २५ कोटी ८० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सराईत गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ९३ अन्वये ५७७ प्रस्ताव संबंधित दंडाधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आले आहेत. सदर सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणुकीचे २९९ बंधपत्र घेण्यात आले असून रक्कम २ कोटी १८ लाख रुपये रकमेची बंधपत्रे घेण्यात आलेली आहेत. एमपीडीए कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या एकूण ९ प्रस्तावांपैकी १ प्रकरणात सराईत गुन्हेगारांविरुद्ध स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अनुज्ञप्तीचे वारंवार सखोल तपासणी करुन नियमबाह्य बाबी आढळल्यास संबंधिताविरुद्ध कठोर कारवाई येत आहे. सन २०२४-२५ वर्षात एकूण ५६९ अनुज्ञप्तीविरुद्ध विभागीय गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यामध्ये ४ अनुज्ञप्ती कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या आहेत. या विभागीय विसंगती प्रकरणात १ कोटी ८६ लाख रुपयांचा दंड LM वसूल करण्यात आला आहे.




### मद्य विक्री व मद्यसेवन करणाऱ्यांविरुध्द कारवाई

» महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६८ व ८४ नुसार धाब्यावर अवैध मद्य विक्री करणाऱ्याविरुद्ध तसेच अवैध ठिकाणी मद्य सेवन करणाऱ्या ग्राहकांविरुद्ध एकूण ४५५ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्यामध्ये १ हजार २५० आरोपीना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाद्वारे आरोपींना एकुण ८ लाख १९ हजार रुपये द्रव्य दंड ठोठविण्यात आलेला आहे. यामुळे केवळ अवैध मद्य विक्री करणाऱ्या विरुद्ध कारवाई न करता त्यासोबत या ठिकाणी मद्यसेवन करणाऱ्यांविरुध्द सुध्दा कारवाई करण्यात आली आहे. यामुळे अवैध ठिकाणी मद्यसेवन करणाऱ्यांनादेखील चाप बसणार आहे.

# पिंपरी-चिंचवड आयुक्तालयात ’स्पेशल 22’

## 22 पोलिस अंमलदारांना न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा पुणे यांच्यामार्फत फॉरेन्सिकविषयक विशेष प्रशिक्षण

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 नुसार सात वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षेस पात्र गुन्ह्यांमध्ये घटनास्थळी वैज्ञानिक तपास व पुरावे संकलन बंधनकारक करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने ‘स्पेशल 22’ हे विशेष प्रशिक्षित पथक तैनात केले असून, यामुळे न्यायप्रक्रिया अधिक शास्त्रीय आणि प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**याआधी काय होतं?**

यापूर्वी घटनास्थळी पोहोचलेले पोलिस अधिकारीच परिस्थितीजन्य पुरावे संकलित करीत होते. मात्र, त्यांच्याकडे फॉरेन्सिकविषयक प्रशिक्षण नसल्यामुळे अनेक वेळा पुरावे संकलनाच्या प्रक्रियेत त्रुटी राहून न्यायप्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता होती. तसेच, वैज्ञानिक दृष्टिकोनातून छायाचित्रण, व्हिडीओ रेकॉर्डिंग व अन्य फॉरेन्सिक प्रक्रिया प्रभावीपणे पार न पडण्याचीदेखील भीती होती.

**..असे चालणार काम**

पोलिस आयुक्तालयातील 22 पोलिस अंमलदारांना न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा पुणे यांच्यामार्फत फॉरेन्सिकविषयक विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. या अंमलदारांना संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये घटनास्थळी त्वरित भेट देऊन फॉरेन्सिक प्रक्रिया राबवणे बंधनकारक करण्यात आले आहे. फॉरेन्सिक कामासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमुळे झालेली अडचण लक्षात घेऊन, नव्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. प्रत्येक प्रकरणात 100 टक्के फॉरेन्सिक प्रक्रिया होईल याची जबाबदारी संबंधित वरिष्ठ पोलिस निरीक्षकांवर देण्यात आली आहे. प्रशिक्षित अंमलदार रजेवर असतील तर लगतच्या पोलिस ठाण्यातील प्रशिक्षित अंमलदार फॉरेन्सिक काम पाहणार आहे. याशिवाय ‘आयकार’ (अंगुली मुद्रा विभाग)कडून पुरावे संकलनासंदर्भात नियंत्रण व अभिलेख अद्ययावत ठेवले जाणार आहेत

सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांमध्ये न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ञांकडून घटनास्थळांवर भेट देवून परिस्थितीजन्य पुरावे गोळा करणे, जतन करून व्हिडीओ आणि छायाचित्रण करणे बंधनकारक आहे. मात्र, पोलिस आयुक्तालयात न्यायसहाय्यक वैज्ञानिक तज्ञ उपलब्ध नसल्याने ‘स्पेशल 22’ हे विशेष पथक कार्यान्वित करण्यात आले आहे.

कामकाजातील अचूकता आणि वेग वाढवण्यासाठी ‘स्पेशल 22’ हे पथक केवळ या कार्यासाठीच ठेवण्यात येणार असून, त्यांना शक्यतो इतर कर्तव्य देण्यात येऊ नयेत, असे आदेश देण्यात आले आहेत. न्यायालयीनप्रक्रियेत अधिक पुरावाधिष्ठित व मजबूत साक्ष मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. ‘स्पेशल 22’ पथकाच्या कार्यक्षमतेमुळे गुन्हे तपासातील अचूकता आणि विश्वासार्हता वाढणार असल्याचे तज्ञांचे मत आहे.




### तपास प्रक्रियेला मिळणार वैज्ञानिक बळ

» स्पेशल 22 मुळे पोलिस तपासप्रक्रियेला वैज्ञानिक बळ मिळणार असून, न्यायालयीनप्रक्रियेत अधिक पुरावाधिष्ठित व मजबूत साक्ष मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. ‘स्पेशल 22’ पथकाच्या कार्यक्षमतेमुळे गुन्हे तपासातील अचूकता आणि विश्वासार्हता वाढणार असल्याचे तज्ञांचे मत आहे..

### वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देखरेख

» परिमंडळचे पोलिस उपायुक्त आणि सर्व सहायक पोलिस आयुक्त हे पोलिस ठाण्यांच्या भेटीत ‘फॉरेन्सिक प्रक्रिया शंभर टक्के पार पडली का’, याचा स्वतंत्र आढावा घेणार आहेत. कामकाजातील अचूकता आणि वेग वाढवण्यासाठी ‘स्पेशल 22’ हे पथक केवळ या कार्यासाठीच ठेवण्यात येणार असून, त्यांना शक्यतो इतर कर्तव्य देण्यात येऊ नयेत, असे आदेश देण्यात आले आहेत.

> वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आम्ही घटनास्थळी पोहोचताच प्रथम झोनिंग करून परिस्थितीजन्य पुरावे, व्हिडीओ व छायाचित्रण याची प्रक्रिया पूर्ण करत आहोत. प्रत्येक पुरावा काळजीपूर्वक आणि शास्त्रीय पद्धतीने संकलित केला जात आहे.
> - विकास मोरे, फॉरेन्सिक प्रशिक्षित अंमलदार, पिंपरी-चिंचवड

# किवळेतील सांडपाणी थेट पवना नदीत, पर्यावरण प्रेमींकडून उपाययोजना करण्याची मागणी

## देहूरोड कॅन्टोनमेन्ट बोर्डाच्या विविध भागातील सांडपाण्यावर कॅन्टोनमेन्ट बोर्ड प्रशासनाकडून कोणतीही प्रक्रिया केली जात नाही.

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूरोड कॅन्टोनमेन्ट बोर्डाच्या विविध भागातील सांडपाण्यावर कॅन्टोनमेन्ट बोर्ड प्रशासनाकडून कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. या भागातील सर्व सांडपाणी ओढे व उघड्या नाल्याद्वारे थेट पवना नदीच्या पाण्यात मिसळत आहे. सांडपाण्यामुळे किवळे गावठाण व सांगवडेकडे जाणाऱ्या रस्त्याने ये-जा करणाऱ्यांना व किवळे गावठाण भागातील नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून तातडीने उपाययोजना करण्याची नागरिकांतून मागणी होत आहे.

पवना नदी प्रदूषणाला मामुर्डी व किवळे-विकासनगर परिसरात मोठ्या प्रमाणात सुरुवात होते. त्यामुळे या भागातूनच जलपर्णी देखील पाहायला मिळते. ओढे व नाल्यांतून देहूरोड बाजारपेठ, आंबेडकर नगर, गांधीनगर, राजीव गांधीनगर, शितळानगर नंबर एक व दोन, विकासनगर रस्त्यालगत संकल्पनगरी परिसरातील गृहसंकुले, मामुर्डी तसेच थॉमस कॉलनी भागातील सांडपाणी वाहत थेट नदीपात्रात जाऊन मुख्य प्रवाहात जात आहे.

सांडपाणी ओढे व उघड्या नाल्याद्वारे थेट पवना नदीच्या पाण्यात मिसळत आहे. सांडपाण्यामुळे किवळे गावठाण व सांगवडेकडे जाणाऱ्या रस्त्याने ये-जा करणाऱ्यांना व किवळे गावठाण भागातील नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून तातडीने उपाययोजना करण्याची नागरिकांतून मागणी होत आहे.



### पिंपरी चिंचवड शहराला अशुद्ध पाणी पुरवठा

» देहूरोड आणि आसपासच्या परिसरातून पवना नदीत सांडपाणी मिसळत आहे. येथून काही अंतरावरच रावेत येथील पवना नदीतून पिंपरी चिंचवडकरांना पाणी पुरवठा करण्यासाठी पाण्याचा उपसा केला जातो. जलशुद्धीकरण प्रकल्पात हेच पाणी शुद्ध करून पिंपरी चिंचवडकरांना पिण्यासाठी दिले जाते.

### उपाययोजनांची गरज

» प्रदूषण करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई व दंड आकारण्याबाबत केंद्र व राज्य शासन स्तरावर तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी व्हायला हवी. यासाठी शासनाने तज्ज्ञ अधिकारी व कर्मचारी नेमायला हवेत. जेणेकरून आगामी काळातील सांडपाण्याबाबत अगोदरच योग्य नियोजन केल्यास नदी प्रदूषण होणे टाळता येईल, असे मत पर्यावरा प्रेमी नागरिक व्यक्त करीत आहेत.


# नदीसुधार प्रकल्प... देवराईच्या मुळावर

## वन विभाग प्रमुखांनी पुणे महापालिकेला केली रामनदी-मुळा संगमावरील आरएफडी प्रकल्प थांबवण्याची शिफारस; तब्बल 8 हेक्टरची 'देवराई'

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यामधील मुळा-मुठा नदीच्या काठांवर नदीकाठ सुधार प्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे. सध्या या प्रकल्पाचे काम दिवसा आणि रात्री देखील सुरू असते. या प्रकल्पामुळे नदीच्या किनाऱ्यावर असलेला पक्षी आणि प्राण्यांचा अधिवास नष्ट होण्याची भीती पर्यावरण अभ्यासक व्यक्त करीत आहेत. त्यातच आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. महापालिकडून नदीकाठ सुधारणेच्या नावाखाली बाणेरमधील रामनदी-मुळा संगमावरील 'देवराई'वर घाव घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. ग्रे हेरॉन, कॉमन लोरा इत्यादी पक्ष्यांच्या दुर्मिळ प्रजाती नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे.

पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या ८ हेक्टर क्षेत्रावर कुऱ्हाड चालविण्याचा डाव पर्यावरणवादी कार्यकर्त्यांच्या जागरूक भूमिकेमुळे हाणून पाडण्यात आला आहे. वनविभागाने पालिकेला तात्काळ हे काम थांबविण्याच्या सूचना केल्या आहेत.



### काय सांगतो वन विभागाचा अहवाल?

- बाणेरमधील रामनदी मुळा संगमाजवळील ८ हेक्टर क्षेत्रामध्ये दुर्मिळ, प्राचीन वृक्ष प्रजाती, झुडुपे, गिर्यारोहक आणि पाणथळ वनस्पतींसह दाट आणि समृद्ध नैसर्गिक अधिवास आहे.
- दुर्मिळ वन्यजीव आणि पक्ष्यांच्या प्रजातींचा अधिवास असल्याचे आले समोर. अनेक पक्ष्यांच्या प्रजाती आढळून आल्या. उंच झाडांमध्ये अनेक पक्ष्यांची घरटी.
- शिवकाळापासूनच्या कोरीवकाम केलेल्या दगडी शिल्पांसह, तीन प्राचीन मंदिरे आढळली.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अलिकडेच या 'देवराई'ची पाहणी करण्यात आली होती. त्यानंतर, वन विभागाने पालिकेला या सूचना केल्या आहेत. पुण्यामधील पर्यावरणवादी कार्यकर्त्या वंदना चौधरी यांनी या वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात पर्यावरण मंत्रालयाशी संपर्क साधला होता. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे त्यांनी नदीकाठ सुधारणा प्रकल्पाबाबत तक्रार केली होती. या प्रकल्पामुळे १ हजारापेक्षा अधिक वृक्षांची होणारी कत्तल आणि नदीकाठ परिसराच्या होणाऱ्या नुकसानीबाबत माहिती देण्यात आलेली होती. तसेच, या परिसरातील वृक्षतोड त्वरित थांबवण्याची मागणी केली होती. केंद्रीय मंत्रालयाने ७ मार्च रोजी राज्य शासनाच्या वन विभागाला यासंबंधी पत्र पाठवले होते. या प्रकरणाची चौकशी करण्याच्या सूचना देखील दिल्या होत्या.

> पुणे महापालिकेने रामनदी-मुळा संगमावर काही क्षेत्र नदीकाठ सुधारणा प्रकल्पासाठी (आरएफडी) चिन्हांकित केली आहेत. सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर २०२४ मध्ये 'जर एखाद्या ठिकाणी 'देवराई' असेल, तर वन विभागाने त्याचे सर्वेक्षण करावे, त्याचे सीमांकन करावे आणि ते सामुदायिक राखीव (कम्युनिटी रिझर्व्ह) म्हणून घोषित करावे.' असे आदेश दिलेले होते. एका स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्तीने याबद्दल पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर, आम्ही रामनदी मुळा संगमावर तपासणी केली. पाहणीमध्ये असे आढळून आले, की याठिकाणी कोणत्याही प्रकारचा विकास झाल्यास अनेक दुर्मिळ प्रजाती कायमच्या नष्ट होतील. या ८ हेक्टर क्षेत्रामध्ये ग्रे हेरॉन, कॉमन लोरा इत्यादी पक्ष्यांच्या अनेक दुर्मिळ प्रजाती आहेत. तिथे जुनी मंदिरे, शिल्पे इत्यादी आहेत. त्यामुळे हे काम थांबविण्याच्या सूचना पालिकेला देण्यात आल्या आहेत.
>
> **- मनोज बारबोले, वनपरिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा**

> रामनदी मुळा संगमाजवळच्या 'देवराई'च्या जागेवर देखील नदीकाठ सुधारणा प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय ऱ्हासाबाबत महापालिकेला कळवले आहे. प्रकल्पाचे काम थांबवून त्याचा पुनर्विचार करण्याची शिफारस केली आहे. आम्ही येत्या काही दिवसांत पालिकेचे आयुक्त आणि इतर अधिकाऱ्यांना भेटणार आहोत. त्यांच्याशी सविस्तर चर्चा करणार आहोत. जर सर्व काही व्यवस्थित झाले, तर रामनदी मुळा संगमावरील 'देवराई' जमिनीचे कोणतेही नुकसान होणार नाही.
>
> **- विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग**

# डिंभे धरणात केवळ 26 टक्के पाणीसाठा शिल्लक

## येणाऱ्या कालखंडामध्ये पाणी काटकसरीने वापरावे लागणार आहे,अन्यथा पाणी टंचाईचा सामना करावा लागेल.अशी शक्यता वर्तविण्यात येते आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरणात गुरुवार दि.१० रोजी केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला असून गत वर्षी ३३.०६ टक्के होता. आंबेगाव,जुन्नर,शिरूर या पुणे जिल्ह्यातील तालुक्यांसह पारनेर,श्रीगोंदा कर्जत या नगर व करमाळा या सोलापूर जिल्ह्यातील तालुक्यांना ही येणाऱ्या कालखंडामध्ये पाणी काटकसरीने वापरावे लागणार आहे.अन्यथा पाणी टंचाईचा सामना करावा लागेल.अशी शक्यता वर्तविण्यात येते आहे.



सध्या वाढलेली उन्हाची तीव्रता पाहता येणाऱ्या काळात पाणी संकट येऊ शकते.अशी भीती जलसंपदा विभागाच्या वतीने वर्तविण्यात येत आहे. आंबेगाव तालुक्यात असणारे दरवर्षी पावसाळ्यात १०० टक्के हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरण भरते. धरणातील पाणी उजव्या कालव्यातून आंबेगाव आणि शिरूर तालुक्यातील गावांना जाते. तर डाव्या कालव्याच्या माध्यमातून आंबेगाव तालुक्याबरोबरच जुन्नर तालुक्यातील येडगाव धरणात जाते.

तेथून नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा,पारनेर कर्जत या तालुक्यांबरोबरच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यापर्यंत पाणी जाते.त्यामुळे हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरणात साठलेल्या पाण्यावर पुणे,नगर व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची शेती तसेच अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत.परिणामी पिण्याच्या पाण्याचा शेतीचा प्रश्न सोडवण्याच्या डिंभे धरणाच्या माध्यमातून होतो.परंतु यावर्षी डिंभे धरणामध्ये केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिलेला आहे.येणाऱ्या कालखंडात पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरणात ३३.०६ टक्के पाणी साठा होता .मात्र यावर्षी गत वर्षीच्या तूलनेत कमी पाणीसाठी शिल्लक असल्याने काटकसरीने पाण्याचा वापर करणे गरजेचे आहे. सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. डिंभे धरणात केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला असून गत वर्षी ३३.०६ टक्के होता. आंबेगाव,जुन्नर,शिरूर या पुणे जिल्ह्यातील तालुक्यांसह पारनेर, श्रीगोंदा कर्जत या नगर व करमाळा या जिल्ह्यातील तालुक्यांना ही येणाऱ्या कालखंडामध्ये पाणी काटकसरीने वापरावे लागणार आहे

### येथे होणार केंद्र

- मागील वर्षी यावेळी हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरणात ३३.०६ टक्के पाणी साठा होता.मात्र यावर्षी गत वर्षीच्या तूलनेत कमी पाणीसाठी शिल्लक असल्याने काटकसरीने पाण्याचा वापर करणे गरजेचे आहे. सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचे बाष्पीभवन होते. तसेच शेती पिकांनाही जास्त पाणी द्यावे लागते. त्यामुळे पाण्याचा वापर वाढला आहे.एकंदरीतच पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.